उल्हासनगर शहरातील प्रलंबित मुद्रांक शुल्क प्रकरणांच्या निपटाऱ्यासाठी "महाराष्ट्र मुद्रांक शुल्क अभय योजना-२०२३" ही योजना एक विशेष बाब म्हणून उल्हासनगर शहरासाठी एक महिन्याच्या कालावधीकरिता लागू करण्याबाबत....

महाराष्ट्र शासन
महसूल विभाग
शासन निर्णय क्रमांक: मुद्रांक-२०२३/प्र.क्र.३४२/मुद्रांक-२
पहिला मजला, मंत्रालय मुख्य इमारत,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक:- ३१ ऑगस्ट, २०२६.

वाचा :-

१. महसूल व वन विभाग, शासन आदेश क्र. मुद्रांक-२०२३/प्र.क्र.३४२/म-१ (धोरण), दि.०७.१२.२०२३.
२. महसूल व वन विभाग, शासन परिपत्रक क्र. मुद्रांक-२०२३/प्र.क्र.३४२/म-१ (धोरण), दि.११.१२.२०२३.
३. शासन शुध्दिपत्रक क्र. मुद्रांक-२०२३/३२६६/प्र.क्र.३४२/म-१ (धोरण),p दि.१३.१२.२०२३.
४.महसूल व वन विभाग, शासन आदेश क्र. मुद्रांक-२०२३/प्र.क्र.३४२/म-१ (धोरण), दि.३१.०१.२०२४.
५.महसूल व वन विभाग, शासन आदेश क्र. मुद्रांक-२०२३/प्र.क्र.३४२/म-१ (धोरण), दि.१५.०३.२०२४.
६.महसूल व वन विभाग, शासन आदेश क्र. मुद्रांक-२०२३/प्र.क्र.३४२/म-१ (धोरण), दि.०१.०७.२०२४.
७.महसूल व वन विभाग, शासन आदेश क्र. मुद्रांक-२०२३/प्र.क्र.३४२/म-१ (धोरण), दि.०१.०९.२०२४.
८.महसूल व वन विभाग, शासन आदेश क्र. मुद्रांक-२०२३/प्र.क्र.३४२/म-१ (धोरण), दि.२१.०७.२०२५.

प्रस्तावना-

महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या कलम ९(अ) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून राज्य शासनाने "महाराष्ट्र मुद्रांक शुल्क अभय योजना-२०२३" ही योजना संपूर्ण महाराष्ट्र राज्यात लागू केली होती. सदर योजनेमुळे मुद्रांक शुल्क व दंडाशी संबंधित मोठ्या प्रमाणावरील प्रकरणांचा निपटारा होऊन शासनास लक्षणीय महसूल प्राप्त झाला.

सदर योजनेअंतर्गत विहित कालावधीत अर्ज दाखल केलेली काही प्रकरणे अद्याप प्रलंबित आहेत. आवश्यक कागदपत्रे उपलब्ध न होणे, पूरक माहिती सादर करण्यास विलंब होणे, बाजारमूल्य निश्चित झाल्यानंतरची पुढील कार्यवाही अपूर्ण राहणे तसेच अन्य प्रक्रियात्मक कारणांमुळे काही प्रकरणांचा निपटारा होणे बाकी आहे.

उल्हासनगर शहरातील अशा प्रलंबित प्रकरणांचा विहित कालमर्यादेत निपटारा झाल्यास शासनास मुद्रांक शुल्क व दंडापोटी अतिरिक्त महसूल प्राप्त होण्यास तसेच अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या प्रकरणांचा निपटारा होऊन संबंधित नागरिकांना दिलासा मिळण्यास मदत होणार आहे.

दि.२१.०७.२०२५ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे "महाराष्ट्र मुद्रांक शुल्क अभय योजना-२०२३" अंतर्गत विहित मुदतीत अर्ज दाखल केलेल्या मात्र काही तांत्रिक कारणांमुळे विहित मुदतीत चलनाची रक्कम शासन जमा न करू शकलेल्या पक्षकारांना विशेष बाब म्हणून एक महिन्याचा कालावधी देण्यात आला होता.

उल्हासनगर शहरातील सध्या प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी सदर योजनेतील सवलतींचा मर्यादित कालावधीसाठी लाभ देण्याची बाब विचाराधीन होती.

सदर बाब ही संपूर्ण राज्यासाठी लागू होणाऱ्या धोरणात्मक निर्णयाची नसून केवळ उल्हासनगर शहरातील सध्या प्रलंबित प्रकरणांच्या निपटाऱ्यासाठीची विशेष उपाययोजना आहे. त्यामुळे हा निर्णय विशेष बाब (Special Case) म्हणून व त्यातून कोणताही पूर्वदृष्टांत (Precedent) निर्माण होणार नाही, या अटीवर घेणे उचित आहे. त्या अनुषंगाने शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

शासन निर्णय :-

१. उल्हासनगर शहरातील मुद्रांक जिल्हाधिकारी, ठाणे (ग्रामीण) यांच्या कार्यालयात महाराष्ट्र मुद्रांक शुल्क अभय योजना-२०२३ अंतर्गत विहित कालावधीत दाखल झालेली व या शासन निर्णयाच्या दिनांकास प्रलंबित असलेली प्रकरणे निकाली काढण्यासाठी, संबंधित पात्र पक्षकारांना देय मुद्रांक शुल्क व दंडाची रक्कम भरण्याची कार्यवाही पूर्ण करण्यासाठी, विशेष बाब म्हणून या शासन निर्णयाच्या दिनांकापासून ३० (तीस) दिवसांचा अतिरिक्त कालावधी देण्यास शासन मान्यता देत आहे.

२. उपरोक्त अतिरिक्त कालावधीचा लाभ केवळ अशाच पक्षकारांना मिळेल, ज्यांनी "महाराष्ट्र मुद्रांक शुल्क अभय योजना-२०२३" अंतर्गत विहित कालावधीत अर्ज दाखल केलेला आहे आणि ज्यांचे प्रकरण या शासन निर्णयाच्या दिनांकास मुद्रांक जिल्हाधिकारी, ठाणे (ग्रामीण) यांच्या कार्यालयात प्रलंबित आहे.

३. सदर ३० दिवसांचा अतिरिक्त कालावधी नवीन अर्ज दाखल करण्यासाठी उपलब्ध राहणार नाही. या शासन निर्णयाच्या दिनांकानंतर नव्याने दाखल होणाऱ्या कोणत्याही प्रकरणास या शासन निर्णयाचा लाभ मिळणार नाही.

४. उपरोक्त कालावधीत संबंधित पात्र पक्षकारांनी अभय योजनेनुसार देय असलेले मुद्रांक शुल्क व दंड विहित पद्धतीने शासन जमा करावा तसेच प्रकरणाच्या निपटाऱ्यासाठी आवश्यक असलेली कागदपत्रे/माहिती सादर करावी.

५. सदर मुदतवाढीचा लाभ केवळ उल्हासनगर शहरातील मुद्रांक जिल्हाधिकारी, ठाणे (ग्रामीण) यांच्या कार्यालयात प्रलंबित असलेल्या पात्र प्रकरणांपुरता मर्यादित राहील. राज्यातील इतर कोणत्याही कार्यालयातील प्रकरणास या शासन निर्णयाचा लाभ अनुज्ञेय राहणार नाही.

६. मुद्रांक जिल्हाधिकारी, ठाणे (ग्रामीण) यांनी उपरोक्त ३० दिवसांच्या कालावधीत सर्व पात्र प्रलंबित प्रकरणांची आवश्यक कार्यवाही पूर्ण करून त्यांचा निपटारा करावा.

७. मुद्रांक जिल्हाधिकारी, ठाणे (ग्रामीण) यांनी सदर कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर अनुपालन अहवाल (Compliance Report) नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे तसेच महसूल विभाग, मंत्रालय, मुंबई यांना सादर करावा.

८. सदर शासन निर्णयातील तरतुदींमुळे कोणत्याही व्यक्तीस भविष्यात अशाच प्रकारची मुदतवाढ अथवा सवलत मागण्याचा कोणताही हक्क प्राप्त होणार नाही.

९. सदर निर्णय हा केवळ विशेष बाब (Special Case) म्हणून घेण्यात येत असून, यामुळे भविष्यातील कोणत्याही प्रकरणास किंवा राज्यातील इतर कोणत्याही क्षेत्रास कोणताही पूर्वदृष्टांत (Precedent) निर्माण होणार नाही.

१०. या शासन निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी आवश्यक त्या प्रशासकीय सूचना संबंधित अधिकाऱ्यांना निर्गमित कराव्यात.

०२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सकेताक २०२६०८३११५२८४८६९४८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SATYANARAYAN SHIVPRASAD BAJAJ

Digitally signed by SATYANARAYAN SHIVPRASAD BAJAJ
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT,
2.5.4.20=559498df564ab1121a356349085c1b8e3cc0f12569ba0f7f2090386d4dccb333, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=F7145AF5949FB706E2DCB06C2B209B58FFA369F6E085E02041722C90F0528791, cn=SATYANARAYAN SHIVPRASAD BAJAJ
Date: 2026.08.31 15:29:43 +05'30'

(सत्यनारायण बजाज)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत -

१. मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
५. अपर मुख्य सचिव (महसूल) मंत्रालय, मुंबई.
६. नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. जिल्हाधिकारी, ठाणे.
८. मुद्रांक जिल्हाधिकारी, ठाणे (ग्रामीण).
९. नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, पुणे विभाग.
१०. सह जिल्हा निबंधक वर्ग-१ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, ठाणे.
११. संबंधित सह दुय्यम निबंधक, वर्ग-२.
१२. निवड नस्ती, कार्यासन मुद्रांक-२, महसूल विभाग, मंत्रालय, मुंबई.

****